# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

## विद्यापीठाने निर्मिती केलेले सुधारीत व संकरीत वाणाबद्दल सर्व समावेशक व सविस्तर माहिती

| अ.क्र. | तपशील | सविस्तर माहिती |
|---|---|---|
| १ | पीक/वाणाचे नाव | **तूर : बीडीएन-७१६** |
| २ | प्रसारीत केल्याचे वर्ष | २०१६ |
| ३ | प्रसारीत करणारी संस्था/विद्यापीठ | वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी |
| ४ | जमीन | जमिनीचा ६.५० ते ७.५० सामू, मध्यम व भारी जमीन |
| ५ | हवामान | तूर पिकांस २१ ते २४ अंश सें. तापमान व वार्षिक सरासरी ७०० ते १००० मिमी पर्जन्यमान |
| ६ | पेरणी/लागवडीचा कालावधी | १५ जून ते १५ जुलै |
| ७ | प्रती एकर बियाणे | ६ किलो |
| ८ | पीक व्यवस्थापन | |
| | १ लागवडीचे/पेरणीचे व्यवस्थापन | जिरायत लागवडी करीता दोन ओळीतील अंतर ९० सेंमी व दोन रोपातील अंतर २०-३० सें.मी. ठेवावे. बियाणे ४ ते ५ सें.मी. खोल पडेल अशा प्रकारे पेरणी करावी. बागायतीसाठी एके ठिकाणी दोन ते तीन बिया टाकून ९० X ९० सेमी अंतरावर टोकन पद्धतीने लागवड करावी. टोकण पद्धतीने ५ ते ६ किलो प्रती हेक्टरी बियाणे पुरेसे होते. |
| | २ खत व्यवस्थापन | तूरीच्या जोमदार वाढीसाठी पेरणीच्या वेळी हेक्टरी २५ किलो नत्र व ५० किलो स्फुरद द्यावे. जमिनीच्या पृथःकरणात कमतरता आढळल्यास हेक्टरी ३० किलो पालाश वापरावे. याशिवाय हेक्टरी २० ते २५ किलो गंधक जिप्समद्वारे देण्याची शिफारस करण्यात आली आहे. |
| | ३ पाणी व्यवस्थापन | सुरवातीच्या काळात १५ ते २० दिवस आणि शेंगा तयार होण्याच्या काळात २५-३० दिवस पाण्याचा ताण पडल्यास पाणी देणे आवश्यक आहे. विशेषतः पीक फुलो-यात असतांना आणि शेंगात दाणे भरतांनाचा कालावधी अत्यंत संवेदनशील आहे. या पिकांमध्ये तीन अवस्था पाण्यासाठी संवेदनशील आहेत १. कळी अवस्था २. फुलोरा ३. शेंगात दाणे भरतांनाची अवस्था.जमिनीत ओलावा नसल्यास पाण्याच्या पाळ्या देणे आवश्यक आहे. |
| | ४ कीड व्यवस्थापन | तूरीच्या पिकाचे आर्थिक नुकसान पिसारी पतंगांची अळी, शेंगा पोखरणारी अळी व शेंगमाशी मुळे होते. या कीडींच्या नियंत्रणासाठी ५ टक्के निंबोळी अर्क आणि २ टक्के साबणांचा चुरा या मिश्रणांची दोन फवारण्या १५ दिवसांच्या अंतराने कराव्या, शेंगा पोखरणा-या अळीने आर्थिक नुकसानीची पातळी ओलांडल्यास इमामेक्टीन बेन्झोएट ५ एसजी ३ ग्रॅम किंवा इंडोक्झाकार्ब १५.८ ईसी ७ मिली किंवा फ्ल्युबेन्डामाईड ३९.३५ एससी २ मिली प्रती १० लीटर पाण्यात मिसळुन साध्या पंपाने फवारणी करावी. |
| | ५ रोग व्यवस्थापन | तूर पिकावर प्रामुख्याने आढळून येणारे महत्त्वाचे रोग म्हणजे मर आणि वांझ होय. या रोगाच्या नियंत्रणासाठी रोगप्रतीबंधक वाणांचा वापर करावा. ज्वारी, बाजरी असे आंतर पीक घ्यावे जेणे करुन रोगाची साखळी खंडीत होईल. पेरणी पूर्वी बियाण्यास २ ते २.५ |

| | | |
|---|---|---|
| | | ग्रॅम थायरम किंवा बाविस्टीन चोळावे. रोग ग्रस्त झाडे उपटून नष्ट करावीत. |
| **९** | **पिकाचा कालावधी** | १६५ ते १७० दिवस |
| **१०** | **उत्पादकता** | १८-२२ क्विंटल प्रती हेक्टरी |
| **११** | **वाणाची वैशिष्ट्ये/विशेष गुणधर्म** | १. मर व वांझ रोगास प्रतीबंधक<br>२. दाण्याचा रंग तांबडा<br>३. दाळ उत्तम प्रतीची<br>४. कोरडवाहू लागवडी करीता तसेच दोन पाणी देण्याची सोय असल्यास उत्पादनात वाढ होते. |
| **१२** | **वाणासंबंधीचे छायाचित्रे** |  |